महावितरण

जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते कि, महावितरण नागपूर ग्रामिण मंडल अंतर्गत सन २०२६-२७ करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक १७.११.२०२६ (००.०० तासापासुन) ते दिनांक २३.११.२०२६ (२४.०० तासापर्यंत) विभाग निहाय आस्थापना नोंदणी क्रमांकावर online अर्ज करावे. नागपूर ग्रामिण मंडल, नागपूर अंतर्गत असणाऱ्या विभागाचे आस्थापना नोंदणी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

अनु.क्रं	विभागांचे नांव	आस्थापना नोंदणी क्रमांक	विजतंत्री	तारतंत्री	एकुण
१	काटोल विभाग	E०५२०२७००१७१	१७	१२	२९
२	मोदा विभाग	E१२१७२७००१३२	११	१०	२१
३	सावनेर विभाग	E०११८२७०००२६	२०	८	२८
४	उमरेड विभाग	E१२१७२७००१८९	८	८	१६

१) शैक्षणिक अर्हता - १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, २) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.

२) शैक्षणिक दस्ताऐवज - १) एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री/तारतंत्री चार सेमिस्टर गुणपत्रिकाची मूळप्रत, २) आधारकार्ड व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगीक आवश्यक कागदपत्रांची मूळप्रत उमेदवारांने स्वत: च्या प्रोफाईलवर स्कॅन करुन अपलोड करावे. सर्व उमेदवारांनी आवश्यक असलेली कागदपत्रे पोर्टल वर अपलोड करणे अत्यंत गरजेचे आहे.

३) विद्यावेतन - महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रकानुसार विद्यावेतन लागु राहील.

४) वयोमर्यादा - दिनांक ३१.१०.२०२६ पर्यंत १८ ते ३२ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथील राहील.

वरील शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवाराची नोंदणी ग्राहय धरल्या जाईल. ५) नमुद पद संख्या कमी जास्त करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविल्या जाणार नाही. ६) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल. ७) वरील कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही. ८) शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी व आय.टी.आय गुणांच्या टक्केवारीनुसार (अनुक्रमे ६० व ४० टक्के) अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल. ९) शासन निर्णया नुसार अनुसुचित जाती करिता १:१० व अनुसुचित जमाती करिता १:११ प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरिता शासन निर्णयनुसार पदे राखीव राहतील. १०) तसेच उमेदवारांनी संकेतस्थळावर Online Registration ची नोंदणी केल्याची प्रत (www.apprenticeshipindia.org) व शैक्षणिक आर्हता धारण केलेल्या गुणपत्रिका / प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रतीसह आपला अर्ज दिनांक १७.११.२०२६ ते २७.११.२०२६ पर्यंत संबंधीत कार्यालयास कामकाजाचे दिवशी सादर करावे व जे उमेदवार आपले संपूर्ण दस्ताऐवजसह संबंधित कार्यालयास अर्ज सादर करणार नाहीत. त्या उमेदवारांचा प्रशिक्षणा करिता निवड करण्याबाबत विचार करण्यात येणार नाही. ११) तसेच विभागाच्या कार्यक्षेत्रातंर्गत रहीवासी असलेलेच उमेदवारांचे अर्ज संबंधीत विभागाकरिता ग्राहय धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. १२) ज्या शिकाऊ उमेदवारांनी विजतंत्री/तारतंत्री व्यवसायात या पुर्वी प्रशिक्षण घेतले असल्यास अशा उमेदवारांनी प्रशिक्षणाकरिता अर्ज करु नये.

NZ/PR/No. 179/2026 Dt. 13.11.2026

अधीक्षक अभियंता, नागपूर ग्रामीण मंडल, महावितरण, नागपूर